**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लोक सहभागाद्वारे राबविण्यात येत असलेल्या नदी पुर्नजीवन कार्यक्रम विविध योजनांचे अभिसरण (Convergence) करून प्रभावीपणे राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः नपुयो-२०१५/प्र.क्र.३७०/जल-७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ८ डिसेंबर, २०१५

**वाचा :**

१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र. जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४, २८ जानेवारी २०१५ व ३ मार्च २०१५.

**प्रस्तावना :**

सर्वासाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असुन याबाबत विस्तृत सूचना शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

०२. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडविणे, विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे, जुन्या बंद पडलेल्या योजनांचे पुनर्जिवन, अस्तित्वातील जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, पाण्याच्या ताळेबंदाबाबत जाणीव जागृती निर्माण करणे, भुर्गभातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या कार्यक्षम वापरात वाढ करणे, लोकसहभाग वाढविणे इ. या अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. हे उद्देश सफल करण्यासाठी पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरण व रुंदीकरण, जुन्या संरचनांचे पुनर्जिवन करणे, पाझर तलाव / ल.पा. तलाव दुरुस्ती, विहीर / बोअरवेल पुर्नभरण, कालवा दुरुस्ती, पाण्याचा कार्यक्षम वापर इ. कामे या अभियानांतर्गत हाती घेण्यात येत आहेत.

०३. सर्वसाधारणपणे असा अनुभव आहे की, नदी पात्रात गेल्या अनेक वर्षामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचून नदयांचे पात्र उथळ व अरूंद झाल्याने नदीपात्रात पाणीसाठा होण्याची क्षमता कमी झालेली आहे त्यामुळे भुजल पुर्नभरण कमी प्रमाणात होत आहे. त्याच प्रमाणे उथळ नदी पात्रामुळे पावसाळयात काही वेळा पुराचा धोका निर्माण होत आहे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत काही जिल्ह्यांमध्ये ( सागंली, उस्मानाबाद, लातूर ) नदी /ओढा / नाला पात्रातील गाळ काढण्याचे काम मोठया प्रमाणात झाले आहे. नदी / ओढा / नाल्याचे पात्र विस्तृत झाल्याने पाणीसाठयात वाढ झालेली आहे. तसेच भुर्गभातील पाण्याच्या पातळीत उल्लेखनीय वाढ झालेली असून अकोला जिल्ह्यात विद्रुपा नदीवर करण्यात आलेल्या कामामुळे तेथील पुराचा धोका टळलेला असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्याचप्रमाणे नदी पुर्नजिवन कार्यक्रमामुळे शेतीसाठी / जनावरांच्या पिण्यासाठी तसेच जनतेच्या

पिण्याच्या पाण्यासाठी पाणी उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न मोठया प्रमाणात सोडविण्यास मदत झालेली आहे.

०४. जलयुक्त शिवार अभियानामध्ये नदया/ओढे/नाले यांचे खोलीकरण/रुंदीकरण करुन लोकसहभागातून गाळ काढण्याच्या कामांमध्ये जनतेची चळवळ निर्माण झालेली आहे. डॉ.राजेंद्रसिंह राणा, मॅगसेसे पुरस्कार विजेते यांनी राजस्थान राज्यात नदी पुर्नजीवना संदर्भात उल्लेखनीय काम केले आहे. नदी पुर्नजीवन कामाबाबत मा. मंत्री जलसंधारण यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. राजेंद्रसिंह राणा यांच्या उपस्थितीत पुणे येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जलसंधारण / मृदसंधारणाच्या सर्व योजनांचे अभिसरणाच्या ( सिमेंट नाला बांध, महात्मा फुले जल व भुमी अभियानातंर्गत खोलीकरण/ रूंदीकरण, पाणलोट विकास, जुनी कामे दुरूस्ती व पुर्नजीवन, वृक्ष लागवड इ.) माध्यमातुन प्रभावीपणे अमलबंजावणी केल्यास जलयुक्त शिवार अभियान व नदी/ओढे पुर्नजीवन करणे या कार्यक्रमास मोठया प्रमाणात यश प्राप्त होईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

०५. सन २०१५-१६ या वर्षाकरिता जलयुक्त शिवार अभियानांतर्गत लोकसहभागातून ओढा / नाला /नदी यामधुन गाळ काढण्याची कामे देखील मोठया प्रमाणात हाती घेण्यात आली असून, पहिल्या टप्यामध्ये सूमारे १५०० कि.मी .लांबीचे खोलीकरण / रुंदीकरण पुर्ण झाले आहे. त्यापैकी ७६० कि.मी. लांबीचे नाला खोलीकरण / रुंदी करणाचे काम लोकसहभागातून पूर्ण करण्यात आले आहे. ओढा / नाला / नदी यावर शासनामार्फत साखळी सिमेंट बंधारे बांधण्यात आले असून त्याचा अतिशय चांगला दृष्यपरिणाम दिसत आहे. यामुळे नदी / ओढा / नाला पुर्नजीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी / श्रमदानाद्वारे मोठया प्रमाणात योगदान दिले आहे / देत आहेत, अशा गावांमध्ये हाती घेण्यात आलेल्या नदी / ओढा / नाला पुर्नजीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजनांचे अभिसरण करुन हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

## शासन निर्णय :

१. सर्वासाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणुन राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असुन याबाबत विस्तृत सूचना शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारात अडविणे, विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करणे, जुन्या बंद पडलेल्या योजनांचे पुनर्जिवन, अस्तित्वातील जलस्त्रोतातील गाळ लोकसहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठा वाढविणे, पाण्याच्या ताळेबंदाबाबत जाणीव जागृती निर्माण करणे, भुर्गभातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे, सिंचन क्षेत्रात वाढ करणे, शेतीसाठी संरक्षित पाणी व पाण्याच्या कार्यक्षम वापरात वाढ करणे, लोकसहभाग वाढविणे इ. या अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. हे उद्देश सफल करण्यासाठी पाणलोट विकासाची कामे, साखळी सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरण व रुंदीकरण, जुन्या संरचनांचे पुनर्जिवन करणे, पाझर तलाव / ल.पा. तलाव दुरुस्ती, विहीर / बोअरवेल

पुर्नभरण, कालवा दुरुस्ती, पाण्याचा कार्यक्षम वापर इ. कामे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत हाती घेण्यात येत आहेत.

३. जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमातंर्गत नदी / ओढा / नालामधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे हि कामे लोकसहभागातून करुन नदी / ओढा / नाला पुर्नजीवन करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी / श्रमदानाद्वारे मोठया प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये घेण्यात आलेल्या नदी / ओढा / नाला पुर्नजीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यामातून खालील प्रमाणे कार्यक्रम राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. नदी पुर्नजिवनाची कामे अवर्षण प्रवण क्षेत्र (DPAP) अथवा पाणीटंचाई असलेल्या क्षेत्रात प्रथम प्राधान्याने घेण्यात यावी.

२. नदी/ ओढा/नाले पुर्नजिवीत करताना लोकसहभाग अनिवार्य आहे. त्यासाठी ग्रामसभा घेऊन लोकसहभागातून करावयाच्या कामास मान्यता घेण्यात यावी त्यामध्ये प्रामुख्याने नदी /ओढा/ नाला पात्रातील गाळ काढणे, अतिक्रमण काढून खोलीकरण / रुंदीकरण करणे, वृक्षलागवड, जनजागृती, पर्यवेक्षण इत्यादीमध्ये लोकांचा सहभाग आवश्यक राहील.

३. खोलीकरण / रुंदीकरण संदर्भात शासन निर्णय जलसंधारण विभाग दि. ९ मे, २०१३ मधील सूचनाचे काटेकार पालन करण्यात यावे. आवश्यकते नुसार भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचा सल्ला घ्यावा.

४. नदी / ओढा / नाल्यावर असलेली पुर्वीची बांधकामे (Structures) प्राधान्याने दुरुस्त व पुर्नजीवित करण्यात यावीत. या करीता अस्तित्वातील सर्व कामांचे (Structures) Mapping करुन दुरुस्तीचे कामे उपलब्ध निधीतून प्राधान्याने हाती घेण्यात यावीत.

५. नदी/ओढा/नाला रुंदीकरण खोलीकरण झालेल्या भागामध्ये पाण्याची अधिक उपलब्धता होण्यासाठी सिमेंट नाला बांध बांधकाम / केटी वेअर साठी आवश्यकतेनुसार निधी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावा.

६. खोलीकरण, रुंदीकरण व सरळीकरण करत असताना प्रांत अधिकारी /तहसिलदार यांनी गरजेनुसार अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करावी.

७. नदी / ओढा / नाल्या जवळील पाणलोटाची कामे प्रकल्पाचा भाग म्हणून प्राधान्याने घ्यावीत. पाणलोटात अस्तित्वात असलेल्या माती नाला बांध / सिमेंट नाला बांधाचे खोलीकरण /रुंदीकरण करावे. तसेच पाणलोट पूर्णपणे विकसीत करण्यासाठी उपनाल्यावर छोटे बंधारे घ्यावेत व बिहार पॅटर्ननुसार नरेगातून लोकसहभागाद्वारे नदी/नाला/ओढा काटावर वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

८. **जनजागृती सनियंत्रण व पारदर्शकता** : ग्रामसभा घेऊन गावकऱ्यांना कार्यक्रमाबाबत सर्व माहिती द्यावी. गावातील व गावाच्या बाहेर रहाणाऱ्या रहिवाशांना लोकवर्गणी जमा करण्यासाठी प्रोत्साहीत करावे तसेच वेगवेगळया कंपन्याकडून CSR अतंर्गत निधी उपलब्ध करुन घ्यावा. याकरीता अशासकीय संस्थाची मदत घ्यावी. कामाची अमलबंजावणी करताना कामे गुणवत्तापुर्वक होण्यासाठी Quality Monitor ची नेमणूक करावी. तसेच कामाच्या गुणवत्ता व पारदर्शकता संदर्भात शासन निर्णय जलसंधारण विभाग दि. १३ एप्रिल, २०१५ मधील सूचना नुसार कार्यवाही करावी.

९. नदी / ओढा / नाला पुर्नजीवन कार्यक्रमांतर्गत कमी खर्चाची नाविण्यपूर्ण योजना तयार करण्यात यावी याकरिता जवळील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा नामांकीत तांत्रिक संस्थाची मदत घेण्यात यावी.

१०. जलयुक्त शिवार अभियाना प्रमाणे नदीखोरे नकाशे - MRSAC कडून उपलब्ध करुन सर्व योजनातून अभिसरणाद्वारे मोहिम स्वरुपात हा कार्यक्रम राबविण्यात यावा.

११. हा कार्यक्रम जलयुक्त शिवार अभियानाचा भाग असल्याने जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर प्रांत अधिकारी यांच्या समितीमार्फत राबविण्यात यावा.

१२. सदर कार्यक्रम जलयुक्त शिवार अभियानाचा भाग असल्याने वरील सुचना व शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१४ मधील इतर सर्व सूचना या कार्यक्रमास लागू राहतील.

५. या कार्यक्रमातंर्गत हाती घेण्यात येणाऱ्या विविध कामांवरील होणारा खर्च संबंधीत योजनांच्या लेखाशिर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२०८१५०९१६९३२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ae7faeabaf4571c2748e4dd5ffd2cd108de0e130859970f4d7d0ee40046b3e9e, cn=Narayan Karad
Date: 2015.12.08 17:23:38 +05'30'

**( ना. श्री. कराड )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहाय्यक,
९. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
११.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
१२.आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पूणे.
१३.विभागीय आयुक्त (सर्व)
१४.संचालक (मृदसंधारण), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१
१५.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१६.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७.संचालक, महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२०.अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२२.सर्व जिल्हाधिकारी,
२३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हापरिषद.
२४.महालेखापाल १/२, महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).
२५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२६.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२७. सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण )
२८. सर्व उपायुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय.
२९. सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
३०.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
३१.सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण ).
३२.सर्व वरिष्ठ भूवैज्ञानिक भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
३३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३४.सर्व मंत्रालयीन विभाग,
३५.सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा.वि. व ज.सं विभाग, मंत्रालय, मुंबई
३६.नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३७.सर्व कार्यासने, ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.
३८. जल-७, निवड नस्ती.